पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८
सामान्य प्रशासन विभाग
क्र.साप्रवि/१४/कावि/८3 /२०२४
दि.०७/०४/२०२४

विषय:- अधिकारी / कर्मचारी यांनी स्वत:ची व कुटुंबियांची मालकी असलेल्या मत्ता व दायित्वे यांची वार्षिक माहितीचे विवरण पत्र सादर करणे बाबत. (सन २०२३-२०२४)

**परिपत्रक,**

उपरोक्त विषयांकित प्रकरणी, महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम १९७९ च्या नियम १९ च्या पोटनियम (१) व त्या खालील टीप ३ अनुसार वर्ग-१, वर्ग-२ आणि वर्ग-३ या शासकीय अधिकारी / कर्मचा-यांनी महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक वशिअ-१२१४/प्र.क्र.२६/२०११ मंत्रालय मुंबई-४०००३२ दिनांक- ०२ जुन २०१४ व शासन निर्णय क्रमांक वशिअ-१२१४/प्र.क्र.५१ (२)/११ मंत्रालय मुंबई-४०००३२ दि.१७ नोव्हेंबर २०१४ तसेच महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय क्रमांक संकीर्ण -५०१५/प्र.क्र.२७३/आस्था-८ दि.०७ जानेवारी २०१६ अन्वये प्रत्येक वर्ग-१, वर्ग-२ आणि वर्ग-३ या महापालिका कर्मचा-यांनी त्यांची व कुटुंबियांची मालकी असलेल्या मत्ता व दायित्वे यांची वार्षिक माहितीचे विवरणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

प्रशासन विभागाकडुन परिपत्रक क्र. प्रशा/११/कावि/४१०/२०१४ दि.२७/०६/२०१४ आणि क्र.प्रशा/११/कावि/९१२/२०१४ दि.०८/१२/२०१४ अन्वये महापालिकेच्या गट अ, ब व क मधील अधिकारी / कर्मचारी (गट ड मधील कर्मचारी वगळता) यांनी **प्रत्येक वर्षी ३१ मार्चच्या स्थितीस अनुसरून त्या वर्षाच्या ३१ मे पर्यंत मत्ता व दायित्वे यांची वार्षिक विवरणे सादर करणे आवश्यक आहे.**

**मालमत्ता विवरणपत्रे सादर न करणे व विलंबाने सादर करण्याचे परिणाम पुढील प्रमाणे आहेत.**

१) शासन निर्णय क्रमांक संकीर्ण -५०१५/प्र.क्र.२७३/आस्था-८ दि.०७ जानेवारी २०१६ या शासन निर्णयानुसार कोणतेही विवरण विहीत कालावधीत सादर न केल्यास ती गैरवर्तणुक मानण्यात येईल व अशा वर्तणुकीबद्दल **महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ च्या तरतुदीनुसार शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात येईल.**

२) त्या - त्या वर्षाची मालमत्ता विवरण पत्रे सादर न केल्यास **पदोन्नती, सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजने अंतर्गतच्या पदोन्नती, प्रतिनियुक्ती, विदेश दौरा** यासाठी पुर्व अट म्हणुन विहीत करण्यात येत आहे. परिणामी कोणत्याही कर्मचा-यास आश्वासित व नियमित पदोन्नतीचा लाभ देण्यापुर्वी किंवा प्रतिनियुक्तीस अनुमती देण्यापुर्वी त्याने त्या वर्षाचे ३१ मार्च रोजीचे मालमत्ता विवरणपत्र सादर केले नसल्यास त्याला **पदोन्नती / आश्वासित प्रगती योजनेतील पदोन्नती देण्यात येऊ नये** व अशी विवरण पत्रे सादर केल्यानंतरच त्याला पदोन्नती दिली जाईल.तसेच असे विवरणपत्र सादर केले नसेल तर त्यास प्रतिनियुक्ती किंवा विदेश दौ-यास अनुमती देण्यात येवू नये.

गट "अ" व "ब" (वर्ग-१ व वर्ग-२) यांच्या मालमत्ता विवरणपत्रांची बंद पाकीटे आणि वर्ग-३ च्या कर्मचा-यांची यादी खालील नमुन्यात तयार करुन प्रशासन विभागास सादर करण्यात यावी.

| अ.क्र | संगणक क्रमांक | अधिकारी / कर्मचा-यांचे नाव | पदनाम | मत्ता व दायित्वे विवरणपत्र सादर केले आहे काय? |
|---|---|---|---|---|
| | | | | |

सबब, सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक क्र. प्रशा/११/कावि/४१०/२०१४ दि.२७/०६/२०१४ नुसार **सर्व विभागांनी सन २०२३-२४ या वर्षाची मालमत्ता विवरण पत्रांची माहिती दि.३१/०५/२०२४ पर्यंत सामान्य प्रशासन विभागाकडे पाठवावी.** मालमत्ता विवरण पत्रांच्या माहिती

अभावी कर्मचा-यांना पदोन्नती किंवा सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या लाभासाठी अपात्र ठरविण्यात येईल. याची नोंद घ्यावी. सदरचे परिपत्रक विभागातील सर्व अधिकारी, कर्मचारी यांचे निदर्शनास आणुन दयावे.

(विठ्ठल जोशी)
उप आयुक्त
सामान्य प्रशासन विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८

प्रति,
सर्व संबंधित शाखाधिकारी / विभागप्रमुख
यांचेकडे माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.